# ‘कान्स’ आणि गोल्डन ग्लोब विजेता ‘ॲनॉटॉमी ऑफ अ फॉल’ ‘पीफ’मध्ये

‘सॅम्युअल’ आणि ‘सँड्रा’ची स्वित्झर्लंडमधे आल्प्स पर्वतराजीमध्ये घडणारी कहाणी. ‘सॅम्युअल’ हा एक फ्रेंच लेखक आहे आणि सँड्रा जर्मन लेखक. दोघे पतीपत्नी आणि त्यांना डॅनियल नावाचा मुलगा आहे. दोघांनाही एकमेकांची भाषा येत नाही. ते इंग्रजीमध्ये बोलतात. लहान डॅनियलची एका अपघातामध्ये दृष्टी अधू झाली आहे. या अपघातला आपण जबाबदार असल्याचे ‘सॅम्युअल’ला वाटते.

एक दिवस ‘सॅम्युअल’ घराच्या वरच्या मजल्यावरून पडून मृत्यू होतो आणि त्याचा आरोप ‘सँड्रा’वर येतो. खटला उभा राहतो. सरकारी वकील आणि ‘सँड्रा’वर होणारे आरोप.

‘कान्स’ चित्रपट महोत्सवात विजेता ठरलेला आणि ‘पाम डी ओर’ पुरस्कार मिळालेला ‘ॲनॉटॉमी ऑफ अ फॉल’ हा चित्रपट यावर्षी पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पीफ) पाहायला मिळणार आहे. या चित्रपटाला नुकताच यावर्षीचा इंग्रजी भाषेतर उत्कृष्ट चित्रपटाचा गोल्डन ग्लोब पुरस्कार मिळाला आहे. जगभरातील विविध महोत्सवांमध्ये एकूण ३२ पुरस्कार या चित्रपटाला मिळाले आहेत.

‘पीफ’ १८ ते २५ जानेवारी या काळामध्ये पुण्यातल्या ३ सिनेमा गृहांमध्ये ११ स्क्रीनवर दाखवला जाणार आहे. यामध्ये ‘ॲनॉटॉमी ऑफ ए फॉल’ या चित्रपटाचा जागतिक सिनेमा विभागामध्ये समावेश आहे.

कोणी पाहिलेले नाही. कोणी थेट ऐकलेले नाही. तिसऱ्याने काहीबाही सांगितलेले आणि त्यावर उभा राहिलेला हा ऐकीव गोष्टींवरचा खटला.

कोर्टरूम, कोर्टाबाहेरचे प्रसंग, नवरा बायकोचे संबंध, पोलिस. न्यायालय, पत्रकार आणि ऐकीव माहितीवर मतं तयार झालेले नागरीक.

दिक्दर्शक जस्टीन ट्रियेटनी साऱ्या गोष्टी उत्कृष्टपणे एकत्रीत आणल्या आहेत. पहिल्यापासून उत्कंठावर्धक ठरणारा हा शेवटपर्यंत प्रेक्षकांना खिळवून ठेवतो. कथानक अतिशय गुंतागुंतीचे आहे.

सध्याच्या जगातील ताणतणाव, व्यक्तींमधील परस्पर संबंध, नातेसंबंध अशा अनेक गोष्टींमधून चित्रपट पुढे सरकत जातो. चित्रपटाचा शेवट नेमका कसा आणि काय होतो, हे समजण्यासाठी चित्रपट मुळातून पाहायला हवा.

सँड्रा, सॅम्युअल आणि डॅनियल या चित्रपटातल्या मुख्य भूमिका. मिलो गार्नर या मुलाने डॅनियलची भूमिका केलीय. लक्षात रहावी अशी भूमिका मिलोने साकारली आहे.

सँड्राची भूमिका सँड्रा हुलर या जर्मन अभिनेत्रीने केली आहे. हुलरचे चेहऱ्यावर प्रचंड नियंत्रण दिसते. याच हुलरचा ‘दी झोन ऑफ इंटरेस्ट’ हा जर्मन सिनेमाही कान्समध्ये गाजला आहे.

सँड्रा हुलर हीने जर्मन, ऑस्ट्रियन, अमेरिकन, ब्रिटिश आणि फ्रेंच चित्रपटांमध्ये भूमिका केल्या आहेत. तिने हॅन्स-ख्रिश्चन श्मिडच्या २००६ च्या ‘रिक्वेम’ या नाटकात अॅनेलीज मिशेलची भूमिका केली होती, ज्यासाठी तिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा सिल्व्हर बेअर पुरस्कार मिळाला होता. मारेन एडेच्या २०१६ मध्ये आलेल्या ‘टोनी एर्डमन’मध्ये तीने त्रासलेल्या मुलीची भूमिका केळी होती. त्यासाठी तिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा युरोपियन चित्रपट पुरस्कार मिळाला होता.

सॅम्युअलची भूमिका स्वान अर्लॉड या फ्रेंच अभिनेत्याने केली आहे. रोमँटिक अॅनोनिमस (२०१०), एलेस (२०११), लेस अनार्किस्टेस (२०१५), द वाखान फ्रंट (२०१५), बाडेन बाडेन (२०१६), व्हॅलिअंट हार्ट्स (२०२१) हे त्याचे गाजलेले चित्रपट आहेत.

जस्टिन ट्रियेट ही प्रसिद्ध फ्रेंच चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथा लेखिका आहे. तीला ‘कान्स चित्रपट महोत्सवामध्ये ‘अॅनाटॉमी ऑफ अ फॉलसाठी ‘पाम डी ओर’ पुरस्कार मिळाला आणि हा पुरस्कार जिंकणारी ती तिसरी महिला दिग्दर्शक ठरली

आहे. तीला सर्वोत्कृष्ट पटकथा आणि सर्वोत्कृष्ट परदेशी भाषा चित्रपटासाठी गोल्डन ग्लोब पुरस्कार मिळाला आहे. फ्रान्समध्ये असणाऱ्या लैंगिक समानता समूह ‘कलेक्टिफ ५०/५०’ ची जस्टिन ट्रियेट सदस्य आहे.

गेल्यावर्षी ‘कान्स’मध्ये पुरस्कार घेताना तीने फ्रान्समध्ये चाललेल्या ‘पेन्शन सुधारणा’ निषेध आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आणि अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या दडपशाहीला विरोध केला. तिने फ्रान्सच्या ‘नव-उदारमतवादी सरकार’वर जोरदार टीका केली होती.